फौ. कि. अर्ज क्र. <u>२७५/२०२४</u>
राणी विरूद्ध अतुल
**निशाणी १० खाली**

*(अर्जदार व अर्जदाराचे वकिल न्यायालयासमक्ष हजर आहेत. सामनेवाली क्र. २ व ३ यांचा व तर्फे वकिलांचा वारंवार पुकारा केला असता, गैरहजर. सबब, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९(२)(सी) प्रमाणे पुरावा नोंदवण्यात येत आहे)*

**<u>अर्जदार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ राणी अतुलराव घोटकर यांची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>अर्जदार तर्फे ॲड श्री. एस. एस. खंडेराव यांचे मार्फत</u> —**

सामनेवाला क्र. १ अतुल अशोकराव घोटकर माझे पती असुन, ते सदर अर्ज प्रलंबीत असतांना मयत झाले आहेत. सामनेवाली क्र. २ माझे पतीची आई असुन, सामनेवाली क्र. ३ ही माझे पतीची सख्खी बहिण आहे. सामनेवाला क्र. १ व माझा विवाह झाल्याबाबतचे निमंत्रण पत्रिका मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर निमंत्रण पत्रिकेस **निशाणी ११** देण्यात येते. मी अभिलेखावर लग्नात मला मिळालेले आंदणाची मुळ यादी दाखल केली आहे. त्यावर शेवटी माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर यादीस **निशाणी १२** देण्यात येते. सदर आंदण यादीतील नमुद वस्तु मी सासरी नेल्या होत्या व सद्य:स्थितीत सदर यादीतील सर्व वस्तु सामनेवाली क्र. २ व ३ यांच्या ताब्यात आहेत. मी मला सासरी होणा—या जाचाबाबत अकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीवरून अकोट शहर पोलीस ठाण्यात माझे पती यांचेविरूध्द अदखलपात्र गुन्हा क्र. ०५२६/२०२४ दि. २५/०८/२०२४ रोजी नोंद करण्यात आला होता. मी अभिलेखावर माझे मयत पती अतुल अशोकराव घोटकर यांच्या नावे नमुद असलेले शेत जमीन गट क्र. ४८/१/अ मौजे. ऐवजपुर, ता. अंजनगांव, जि. अमरावती येथील ७/१२ उता—याची संगणकीय प्रणालीवरून प्राप्त केलेली प्रत दाखल केली आहे. सदर ७/१२ उता—यास **निशाणी १३** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — सामनेवाली क्र. २ व ३ तर्फे उलटतपासासाठी न्यायाच्या दृष्टीकोनातुन तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. ०२.०९.२०२५
अकोट